# जी-२० परिषद आणि शाश्वत, संतुलित आणि सर्वसमावेशक विकास

**प्रा.(डॉ) राजू कलमेश सावंत** राज्यशास्त्र विभागप्रमुख, नेमगोंडा दादा पाटील नाईट कॉलेज आर्ट्स अँड कॉमर्स, सांगली

---

**प्रस्तावना :**

सुरुवातीला जी-२० संघटनेचा भर, केवळ व्यापक अशा स्थूलअर्थकारणावर होता, मात्र, जेव्हापासून त्यांचा अजेंडा व्यापक झाला आहे, तेव्हापासून, त्यात व्यापार, हवामान बदल, शाश्वत विकास, आरोग्य, कृषी, ऊर्जा, पर्यावरण, हवामान बदल आणि भ्रष्टाचाराला प्रतिबंध असे विषयही समाविष्ट करण्यात आले आहेत. 'जी २०' अर्थात जगातील वीस प्रभावशाली देशांचा समूह किंवा गट आहे. देशांना एकसंघता, शाश्वत विकास आणि समृद्धीच्या दिशेने नेणारा ठरणार आहे. 'वसुधैव कुटुंबकम् : एक पृथ्वी, एक कुटुंब, एक भविष्य' ही या परिषदेची संकल्पना. याच संकल्पनेतून आणि दृष्टिकोनातून वातावरणासंबंधी आव्हाने, शांतता आणि शाश्वत विकासाच्या मार्गावरील आव्हानांवर आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि सांघिकरित्या मात करण्यासाठी एक 'सर्वंकष आराखडा २०३०' मांडण्यात आला आहे. जी २० च्या संपूर्ण कार्यप्रवाहांमध्ये विकासाच्या मुद्द्यांवरील भर वाढवून शाश्वत विकास घडवून आणण्याची प्रक्रिया अधिक गतीमान करण्याकडे भारता प्रयत्न केला आहे. जी-२० नेत्यांनी केलेली पहिली आणि सर्वात महत्त्वाची वचनबद्धता ही एक मजबूत, शाश्वत, संतुलित आणि सर्वसमावेशक विकासाची पातळी गाठणे आहे.

**उद्दिष्टे :**

१.जी-२० परिषदेचे महत्व अभ्यासणे.

२.शाश्वत विकासाची गरज अभ्यासणे.

३.जी-२० परिषदेच्या माध्यमातून शाश्वत विकासासाठी केलेले कार्य अभ्यासणे.

**जी-२० परिषदेचे महत्व :**

जगातील विविध देशांमध्ये राजकीय आणि आर्थिक संकटं निर्माण झाल्यानंतर जी ७ या गटाची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर या परिषदेत देशांची संख्या वाढवण्यात आली. तेव्हापासून या परिषदेला जी २० असे नाव देण्यात आले. २००८ नंतर जी- २० परिषदेतीला प्रमुख देशातील नेत्यांची उपस्थिती राहू लागली. जी २० परिषदेतील देशांनी हवामान बदल आणि शाश्वत ऊर्जा यांसारख्या मुद्द्यांवर लक्ष केंद्रित केले आहे.

अशा प्रकारे जी २० किंवा ग्रुप ऑफ ट्वेंटी हा अशा देशांचा क्लब आहे, जो जागतिक आर्थिक आणि राजकीय समस्यांवर चर्चा करण्यासाठी, त्यावर उपाय शोधण्यासाठी दरवर्षी एकत्र येत असतो. सर्व जी २० देशांचा जगातील आर्थिक उत्पादनात ८५ टक्के वाटा आहे. याशिवाय जागतिक व्यापारात जी २० देशांची ७५ टक्क्यांची भागिदारी आहे. तसेच या परिषदेत सहभागी होणाऱ्या देशांची लोकसंख्या जगाच्या लोकसंख्येच्या दोन तृतीयांश इतकी आहे. जी २० परिषदेमध्ये अर्जेंटिना, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, कॅनडा, चीन, फ्रान्स, जर्मनी, भारत, इंडोनेशिया, इटली, जपान, मेक्सिको, रशिया, सौदी अरेबिया, दक्षिण आफ्रिका, दक्षिण कोरिया, तुर्की, यूके, यूएस आणि युरोपीयन युनियन असे २० देश आहे.

**शाश्वत विकास :**

भविष्यकालीन विकासाच्या गरजांच्या संदर्भासह सध्याचा विकास असे शाश्वत विकास मानतो. उपलब्ध साधनसंपत्तीच्या अतिरिक्त पिळवणुकीने भविष्यकालीन पिक्यांसाठी अनेक समस्या निर्माण होऊ शकतात. साधनसामग्रीच्या शाश्वत उपयोगावर भविष्यकालीन यांच्या गरजांचा विचार करून निर्णय घेणे योग्य असते. यूटलँड अहवालानुसार "शाश्वत विकास म्हणजे असा विकास की जो भविष्यकालीन पिढ्याच्या त्यांच्या स्वत:च्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमतेशी कोणतीही तडजोड न करता सध्याच्या गरजा पूर्ण करणे होय." तर रॉबर्ट ॲलन यांच्या मते "शाश्वत विकास म्हणजे असा विकास कि जो मानवी गरजांचे समाधान चिरकाल टिकवणे आणि मानवी जीवनाचा दर्जा सुधारणे हे साध्य करणे होय."

**शाश्वत विकासाची गरज :**

वाढत्या पर्यावरण समस्येने अनेक देशांचे लक्ष शाश्वत विकासाकडे वेधले गेले आहे. त्यातून जगातील सर्व राष्ट्रांची याविषयावर चर्चा व जागरूकता निर्माण होण्यासाठी वसुंधरा शिखर परिषद भरवण्यात आली. सन १९८८ मध्ये हवामान बदलाच्या 'आंतरशासकीय चौकशीची 'समिती' निर्माण केली. ऑक्टोबर २००८ मध्ये जागतिक शिखर परिषदेमध्ये २००७ च्या आंतरराष्ट्रीय हरित शिखर परिषदेकडे स्थापन केली. परिणामी याकडे जगातील अनेक संस्था आणि संघटनानी प्रयत्न करण्यास सुरवात केली. यावेळी हवामान बदलाचा सामना करताना निव्वळ निर्बंधात्मक वृत्ती सोडून, काय केले पाहिजे त्यावर लक्ष केंद्रित करून अधिक रचनात्मक वृत्ती स्वीकारण्याची गरज आहे. शाश्वत तसेच लवचिक नील अर्थव्यवस्थेसाठी

चेन्नई 'एचएलपीएस'मध्ये आपले महासागर निरोगी राखण्यावर लक्ष केंद्रित केले आहे. आपल्या अध्यक्षतेतून हरित हायड्रोजन नवोन्मेष केंद्रासह, स्वच्छ आणि हरित हायड्रोजनसाठी जागतिक परिसंस्था उदयाला येईल.

या शाश्वत विकासासाठी सामाजिक, आर्थिक व पर्यावरणीय परिमाणांचे एकत्रीकरण करून खालील उद्दिष्टे निश्चित केले आहे.

- दारिद्रय निर्मूलन : सर्वत्र, सर्व स्वरूपातील दारिद्र्य / गरिबी नष्ट करणे.
- भूक निर्मूलन : अन्नाची सुरक्षितता व सुधारित पौष्टिकता साध्य करणे आणि शाश्वत शेतीची जाहिरात करणे.
- चांगले आरोग्य : निरोगी आयुष्याची खात्री करून घेणे आणि सर्व वयोगटांमधील लोकांना स्वास्थ्य राखण्यास मदत करणे.
- दर्जेदार शिक्षण : सर्वांसाठी सर्वसमावेशित व योग्य शिक्षणाची खात्री करून घेणे आणि सर्वांना आयुष्यभर शिक्षणाच्या सुसंधी मिळवून देण्यासाठी मदत करणे.
- लैंगिक समानता : लैंगिक समानता साध्य करणे आणि सर्व महिला व मुलींना अधिकार देणे.
- शुद्ध पाणी आणि आरोग्यदायी स्वच्छता : सर्वांसाठी पाणी आणि आरोग्यदायी स्वच्छता उपलब्ध असल्याची खात्री करून घेणे आणि त्याची व्यवस्था बघणे.
- नूतनीकरण करण्याजोगी आणि स्वस्त ऊर्जा : सर्वांना स्वस्त, विश्वसनीय, शाश्वत व आधुनिक ऊर्जा उपलब्ध असल्याची खात्री करून देणे.
- चांगल्या नोकऱ्या आणि अर्थशास्त्र : सर्वांसाठी, कायम चालू ठेवलेली (सस्टेन्ड), सर्वसमावेशक व शाश्वत आर्थिक वाढ, पूर्ण आणि फलदायी कामधंदा / नोकरी आणि योग्य काम मिळवून देण्यास मदत करणे.
- नवीन उपक्रम आणि पायाभूत सुविधा : लवचिक पायाभूत सुविधा उभारणे, सर्वसमावेशक व शाश्वत उद्योगीकरण आणि भरभराटीस साह्य करणाऱ्या नवीन उपक्रमांना मदत करणे.
- असमानता कमी करणे : सर्व देशांमधील आणि देशांची आपापसांतील असमानता कमी करणे.
- शाश्वत शहरे व वसाहती : शहरे व मानवी समाजांना सर्वसमावेशक, सुरक्षित, संवेदनक्षम व शाश्वत बनविणे.
- उपलब्ध साधनांचा जबाबदारीपूर्वक वापर : साधनांचा शाश्वत उपभोग आणि उत्पादन नमुना यांची खात्री करून घेणे.
- हवामानाचा परिणाम : हवामानातील बदल आणि त्यांच्या परिणामांचे निराकरण करण्यासाठी त्वरित उपाययोजना करणे.
- शाश्वत महासागर : शाश्वत विकासासाठी महासागर, समुद्र व सागरी साधने यांचे जतन करणे आणि त्यांचा सातत्याने वापर करणे.
- जमिनीचा शाश्वत उपयोग : जमिनीवरील पर्यावरण संस्थेचे रक्षण करणे, त्याची पुनर्स्थापना करणे, त्याचा शाश्वत वापर करण्यास मदत करणे, सातत्याने जंगलांची व्यवस्था बघणे, जंगले ओसाड होण्यापासून थांबवणे, जमिनीची धूप थांबवणे व धूप झालेल्या जमिनीची पुनर्स्थापना करणे आणि जैवविविधतेची हानी होण्यापासून थांबवणे.
- शांतता आणि न्याय : शाश्वत विकासासाठी शांतताप्रिय आणि सर्वसमावेशक समाजांना प्रोत्साहन देणे, सर्वांना न्याय मिळवून देणे, सर्व पातळ्यांवर कार्यक्षम, जबाबदार आणि सर्वसमावेशक संस्था स्थापन करणे
- शाश्वत विकासासाठी भागीदारी : शाश्वत विकासाची पूर्तता करण्याच्या पद्धती सामर्थ्यवान करणे आणि जागतिक भागीदारीमध्ये नवचैतन्य निर्माण करणे.

वरील उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी जागतिक स्तरावर अनेक संघटनात्मक कार्य सुरु केले आहे. २०१५ मध्ये आपण आंतरराष्ट्रीय सौर आघाडी स्थापली. त्यातील जागती स्तरावर प्रभावीपणे उदयास आलेली संघटना म्हणजे २०- परिषद होय. या संघटनेने कार्यगट स्थापन करून त्यासाठी प्रयत्न केले.

**शाश्वत विकासाठी 'जी -२०' विकास कार्य गट :**

'जी २०' हा आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्यासाठीचा प्रमुख मंच आहे. २०१० च्या संकटानंतर स्थापन करण्यात आलेल्या 'जी २०' कार्य गटांपैकी विकास कार्य गट हा पहिल्या काही गटांपैकी एक आहे. 'जी २०' कार्यगटाची स्थापना २०१० साली झाली. तेव्हापासून 'विकास कार्य गट' हा शाश्वत विकासाच्या आराखड्याच्या संरक्षणासाठी कार्य करत आहे. त्या अनुषंगाने २०१५ मध्ये जी २० परिषदेने 'शाश्वत विकास आणि त्यासाठीची उद्दिष्टे' असा कृती आराखडा तयार करून हा कृती आराखडा २०३० पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निर्धारित केले.

'जी २०' चा विकासाचा कार्यगट हा दक्षिण कोरियाच्या अध्यक्षपदाच्या कार्यकाळात स्थापन करण्यात आला आहे. या वेळी सेऊल करार करण्यात आले. त्यामध्ये नऊ स्तंभीय, बहुस्तरीय विकास आराखडा निश्चित करण्यात आले. त्याला 'सेऊल सहमती जाहीरनामा' जारी केला आहे. यानुसार बहुस्तरीय विकासावर भर देणाऱ्या विकासाच्या प्रतिबद्धतेचे मूल्यवर्धन करण्याचा प्रयत्न यात करण्यात आले.

**विकास कार्य गटाचे कार्यप्रणाली:**

जी-२० च्या विकास कार्य गटाने बहुस्तरीय विकासाबरोबरच ऊर्जा सुरक्षा, हवामान बदल, अन्न सुरक्षा, जागतिक आरोग्य आणीबाणी आणि गरिबी आदी आव्हानात्मक विषय हाताळन्यास सुरवात केली. रशियाच्या अध्यक्ष पदाच्या कार्यकाळात २०१३ मध्ये विकास कार्य गटाने विकास वचनबद्धतेचे मूल्यांकन आणि उत्तरदायित्व सुनिश्चित करण्याची प्रक्रिया सुरू सुरु करून रशियन 'उत्तर दायित्व' हा मुद्दा प्रखरतेने मांडले. त्या अनुषंगाने ऑस्ट्रेलियन अध्यक्षपदाच्या कार्यकाळात २०१४ साली 'उत्तरदायित्व सुकाणू समिती' स्थापन करण्यात आली. त्यानंतर विकास कार्य गटाच्या अंतर्गत सदस्य राष्ट्रांनी एक संस्थात्मक यंत्रणाही विकसित करून कार्य सुरु केले.

या संस्थात्मक यंत्रणेने २०१६ मध्ये चीनच्या अध्यक्षपदाच्या कार्य काळात 'जी २०' राष्ट्रांनी या '२०३०' च्या कार्यक्रम पत्रिकेसाठीचा कृती आराखडा निश्चित केला आणि सदस्य राष्ट्रांना त्या बाबत मार्गदर्शन करण्यासाठी उच्चस्तरीय मार्गदर्शक तत्वे जारी करण्यात आली. यानुसार या गटाने दर्जेदार पायाभूत सुविधा, अन्न सुरक्षा, ग्रामीण युवक रोजगार, शाश्वत विकासासाठी वित्तपुरवठा, एकात्मिक राष्ट्रीय वित्तपुरवठा आराखडा, विकसनशील देशांमधील शाश्वत विकासासाठी धोरणात्मक वित्त पुरवठा या विषयी कार्य करत आहे.

**सर्वसमावेशक विकासावरील जी-२०घोषणा:**

**१.विकासासाठी व्यापार सुलभ करणे:**

यामध्ये नियम-आधारित बहुपक्षीय व्यापार प्रणालीसाठी वचनबद्धता करण्याचे घोषित करण्यात आले. तसेच आंतरराष्ट्रीय व्यापर संघटनाच्या नियम-आधारित, भेदभावरहित, निष्पक्ष, मुक्त, सर्वसमावेशक, न्याय्य, शाश्वत आणि पारदर्शक बहुपक्षीय व्यापार प्रणालीच्या सुलभीकरणाचे जाहीर करणे आले.

**२.स्मार्ट व्हॅल्यू चेन आणि डिजिटलायझेशन सुलभ करणे:**

सदस्य राष्ट्रांनी जोखीम ओळखण्यात आणि व्यापारातील लवचिकता वाढविण्यासाठी ग्लोबल व्हॅल्यू चेन (GVCs) मॅपिंगसाठी जी-२०जेनेरिक फ्रेमवर्क स्वीकारण्यास सहमती दर्शविली आली आहे. त्यामध्ये व्यापार दस्तऐवजांच्या डिजिटायझेशन करण्यावर अधिक भर देनाय्त आला आहे.

**३.व्यापार, पर्यावरण आणि विकास सहाय्य:**

व्यापार आणि पर्यावरणविषयक धोरणे परस्पर सहाय्यक आणि आंतरराष्ट्रीय व्यापर संघटना आणि बहुपक्षीय पर्यावरण करारांशी सुसंगत असेल असे घोषित करण्यात आले. यामध्ये शाश्वत विकासावर अधिक भर देण्य आला.

**शाश्वत विकासात भारताची भूमिका :**

नवी दिल्ली मध्ये जी-२० शिखर परिषदेचे अध्यक्षपद भारताला मिअले असून यावेळी भारताने शाश्वत विकासासाठी सर्व सदस्य राष्ट्रांकडून सहमती मिळवली. भारतीय पंतप्रधान आणि परिषदेचे अध्यक्ष नरेंद्र मोदी यांनी मानवकेंद्रित आणि सर्वसमावेशक विकासाचा निर्माण होऊन सर्वसमावेशक, महत्त्वाकांक्षी, निर्णायक आणि कृती-केंद्रित विकास घडवण्याचे उद्दिष्टे निश्चित केले. यावेळी शाश्वत विकासासाठी गांधीजींच्या ध्येयाचे अनुकरण करण्यावर भर देण्यात आले. 'एक पृथ्वी', 'एक कुटुंब' आणि 'एक भविष्य' असाही घोषणा करण्यात आली. तसेच मजबूत, शाश्वत, सर्वसमावेशक आणि संतुलित विकासासाठी प्रयत्न केले.

या परिषदेच्या माध्यामतून भारतने सुधैव कुटुंबकम् ही शाश्वत विकासाची संकल्पना जगासमोर मांडून सर्वांना त्यात समावेश करून घेतले. यातून पर्यावरण, तंत्रज्ञान, पायाभूत सुविधा या क्षेत्रांत भविष्यातील प्रगतीच्या नव्या वाटा प्रशस्त होतील. महिला सशक्तीकरण, लिंगसमानता आणि जागतिक शांततेसाठी सामूहिक प्रयत्नांचा निर्धार यानिमित्ताने होईल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शाश्वत विकासासाठी "भारत प्रगतीसाठी मानवकेंद्रित दृष्टिकोनावरही भर देतो. रांगेतील शेवटचा माणूस म्हणून वंचितांची सेवा करण्याच्या गांधीजींच्या ध्येयाचे अनुकरण करणे महत्त्वाचे आहे. २१ व्या शतकासाठी बहुपक्षीय संस्थांना बळकट करण्यासाठी." पंतप्रधान म्हणाले की, भारत भविष्यातील तांत्रिक परिवर्तन आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा

यासारख्या क्षेत्रांना सर्वाधिक प्राधान्य देतो. "आम्ही लैंगिक समानता, महिला सक्षमीकरण आणि जागतिक शांतता सुनिश्चित करण्यासाठी एकत्रितपणे काम करू शक्ती असे जाहीर केले.

**सारांश :**

२०१५ मध्ये हवामान बदलासंबंधीचा पॅरिस करार आणि शाश्वत विकास उद्दिष्टे संयुक्त राष्ट्रांच्या पुढाकाराने संमत झाली. एकूण विकासाच्या प्रवासातील हे महत्त्वाचे निर्णय होते. हवामान बदलाने सर्वच उद्दिष्टांच्या पूर्तीवर परिणाम होणार आहे. त्यामुळे उद्दिष्टांमध्ये हवामान सुधारणा कृती यावर भर दिला आहे. पॅरिस करारसुद्धा यावरच भर देत असल्याने दोन्हीची सांगड घालून एकत्रित काम करण्याचे धोरण जागतिक पातळीवर निश्चित करण्यात आले.पण त्याचा शाश्वत विकासासाठी संघटनात्मक विकास करण्यावर जागतिक स्तरावर भर देण्यात आला. त्यामध्ये जी-२० परिषदेचे प्रयत्न महत्वाचे आहेत कारण जी-२० परिषद ही जागतिक स्तरावर प्रभावी संघटना असून जगाचे प्रतिनिधित्व करत असते. या परिषदेने जागतिक तापमान वाढ १.५ अंश सेल्सिअसवर मर्यादित करण्यासाठी २०३० सालापर्यंत अपारंपरिक ऊर्जानिर्मिती क्षमता ११ टेरावॉटपर्यंत नेणे अपेक्षित आहे. त्यासाठी जैवइंधनाचा वापर घटविण्यावर सर्व देशांचे एकमत व्हावे, यासाठी भारत गेल्या अनेक वर्षांपासून प्रयत्नशील आहे. जगाच्या ८५ टक्के जीडीपी असलेले आणि ८० टक्के वायू उत्सर्जन करणाऱ्या जी-२० देशांमध्ये एकमत घडविण्याचा प्रयत्न शिखर परिषदेच्या माध्यमातून करण्यात आला. तसेच जी-२० परिषदेतून सर्वसमावेशक, निर्णायक, महत्वाकांक्षी आणि कृती करण्याचे कार्य केले. तसेच 'वसुधैव कुटुंबकम' या संकल्पनेचा मुख्य उद्देश राबवण्यात आला.

**संदर्भसूची :**

१.ढमढेरे एस.व्ही., "शाश्वत विकास आणि भारत", डायमंड पब्लिकेशन, पुणे ,२०१५

२. कदम प्रतिभा , "शाश्वत विकास ध्येये आणि ओळख ", नित्य पब्लिकेशन, २०२१

३. Srinivas V., "G20 @ 2023: The Roadmap to Indian Presidency", Pentagon Press (31 March 2023)

४. दैनिक लोकसत्ता वृत्तपत्र

५.दैनिक महाराष्ट्र टाईम्स

६.दैनिक तरून भारत